# महाराष्ट्र शासन

क्रमांक : संकीर्ण-२००९/प्र.क्र.१५०/का.१२
आदिवासी विकास विभाग,
मंत्रालय विस्तार, मुंबई-३२.
दिनांक : १२ जानेवारी, २०१०

प्रति
आयुक्त,
आदिवासी विकास,
नाशिक.

विषय:-यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या अनु.जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळणेबाबत

संदर्भ:-कुलगुरु, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र.यचममुवि/कु/२१५,दिनांक ९.११.२००९

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक हे विद्यार्थ्यांना दुरस्थ शिक्षण पध्दतीचे शिक्षण देणारे विद्यापीठ आहे. सदर विद्यापीठामध्ये शिक्षण घेणा-या अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाच्या शिष्यवृत्ती योजनांचा लाभ मिळत नसल्याचे संदर्भिय पत्रान्वये कळविलेले आहे.

२. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर भारत सरकार शिष्यवृत्ती देण्याची सुधारित योजना दि.१.४.२००३ पासून लागू करण्यात आली आहे. सदर योजनेच्या मार्गदर्शक सुचनामधील परिच्छेद ३ मधील नियम ix नुसार अनुसूचित जमातीच्या ज्या विद्यार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न रुपये १,०८,०००/- इतक्या मर्यादेपर्यंत आहे अशा दुरस्थ शिक्षण घेणा-या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेचा लाभ देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करण्यात यावा.

३. याबाबत सर्व क्षेत्रिय कार्यालयांना व सर्व वसतीगृहाच्या अधिक्षकाना आवश्यक त्या सूचना तात्काळ निर्गमित करण्यात याव्यात.

निर्गमित
दिनांक १२/१/२०१०

( ग.गो. पंचभाई)
शासनाचे सहसचिव

प्रत,
अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/ठाणे/नागपूर/अमरावती
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.